ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख ४ जुलै, १९५१ | अंक २७

## विविध माहिती

**रेशमाच्या धंद्याचे प्रश्न**—म्हैसूर संस्थानांतील रेशमाच्या धंद्यापुढील प्रश्नांची चर्चा करण्यासाठी एक परिषद नंदी हिल्स येथें भरली होती. रेशमाचें विणकाम, सूत, पुरवठा आणि संशोधन इत्यादि निरनिराळ्या बाबींविषयीं परिषदेंत विचार करण्यांत आला. परिषदेसाठीं सुमारें ५० प्रतिनिधी आले होते.

**विद्युत् पुरवठा केंद्रांची वाढ**—म्हैसूर संस्थानमधील शिवसमुद्रम् आणि शिमशा ह्या वीज-निर्मितीच्या केंद्रांत सध्या ४५,००० किलोवॅट वीज तयार होते. ह्या केंद्रांची वाढ करून ७२,००० किलोवॅट वीज उत्पन्न करण्याची एक योजना आतां आंखण्यांत आली आहे. विजेची मागणी वाढत असल्यामुळें केंद्रांचा विस्तार करावा लागत आहे. नवीन योजनेसाठी २·५ कोटी रुपये खर्च येईल.

**इंदूरच्या व्यापारी कंपनीला दंड**—इंदूरच्या एका व्यापारी कंपनीनें जपानमधून यंत्रांचे सुटे भाग ह्या नांवाखालीं यंत्रांचीच आयात केली व अशा रीतीनें त्यावरील आयात करार चुकविला. ह्या कंपनीला सरकारची फसवणूक केल्याबद्दल १५,००,००० रुपये दंड करण्यांत आला.

**चीन-रशिआ व्यापारी करार**—रशिआ व चीन ह्यांनीं १९५० सालापुरता एक व्यापारी करार केला आहे. कराराप्रमाणें रशिआ चीनला औद्योगिक यंत्रसामुग्री आणि कच्चा माल पुरविणार आहे. चीन आणि चेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्यांतहि अशाच स्वरूपाचा व्यापारी करार करण्यांत आला आहे.

**युद्धांतील हानीपेक्षा अपघाती मृत्यु अधिक**—कोरिआचें युद्ध सुरू झाल्यापासून सुमारें ८०,००० सैनिकांची हानि झाली; परंतु गेल्या वर्षीं अमेरिकेंत झालेल्या अपघातांत १० लाख लोक मृत्यु पावले अशी माहिती प्रे. ट्रूमन ह्यांनीं एका भाषणांत सांगितली. सैनिकांच्या हानीच्या आंकड्यांत आजारानें मेलेले, अपघातांत दगावलेले, कैदी झालेले, इत्यादि सर्व प्रकारच्या सैनिकांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

**१८९३ मधील चित्रपट**—अमेरिकेंतील टेलिव्हिजन सेटवर १८९३ सालापासूनचे चित्रपट पाहून शोकीनांची चांगलीच करमणूक होते. जॉर्ज ईस्टमन हौस ह्या जुन्या चित्रपटांचें जतन करणाऱ्या संस्थेंत सुमारें ७०० जुने चित्रपट आहेत. त्यांतील कांहीं १८९३ सालामधील आहेत. सुप्रसिद्ध नट एमिल जेनिंग्ज ह्यानें काम केलेल्या फौस्ट ह्या चित्रपटाची मात्र एकच प्रत आतां शिल्लक आहे.

**पाकिस्तानकडून मिळणारा ताग**—जुलै ते ऑक्टोबर, १९५१ ह्या चार महिन्यांत भारताला देण्यासाठीं म्हणून १,४५,००० टन ताग पाकिस्तान सरकारनें मंजूर केला आहे. ऑक्टोबर नंतर पिकाची परिस्थिति पाहून अधिक ताग देण्याचा विचार करण्यांत येणार आहे. वरील चार महिन्यांत पाकिस्तानकडून ब्रिटनला ५०,००० टन ताग पुरविण्यांत येणार आहे.

**गुन्हेगारांच्या स्वाक्षरी घेण्याचा षोक**—सार्जंट फाल्वी नांवाच्या अमेरिकन सैनिकानें नाझी गुन्हेगारांच्या स्वाक्षऱ्या मिळविल्या आहेत. हा सैनिक न्यूरेंबर्गच्या तुरुंगांत १९४६ सालीं पहारेकऱ्याचें काम करीत होता. गोअरिंग, रुडॉल्फ हेस, बॅरन फॉन न्यूरॉथ, इत्यादी प्रसिद्ध व्यक्तींच्या सह्या त्याच्या संग्रहीं आहेत.

**माकडांचा नारळ तोडण्याकडे उपयोग**—मलायांतील केलान्टान् संस्थानांत माकडांकरवीं नारळ काढून घेण्यांत येत आहेत. शिकविलेलें एक माकड रोज सुमारें ४०० नारळ काढूं शकतें. एका माकडामागें त्याच्या मालकाला ७ मलायी डॉलर्स मिळतात. माकडाच्या गळ्याला दोरी बांधून झाडावर सोडण्यांत येतें. नंतर मालक माकडाला समजेल अशा भाषेंत त्याला सूचना देतो. हीं माकडें फक्त झालेले नारळच तोडण्यांत पटाईत आहेत. एका झाडावरचे नारळ तोडून झाल्यावर माकड लगेच दुसऱ्या झाडावर उडी मारतें.

**१,००,००० टन रशिअन गहूं**—भारत व रशिआ ह्यांच्यांत नुकताच एक व्यापारी करार पुरा झाला. करारान्वयें रशिआ भारताला १,००,००० टन गहूं पुरविणार आहे. त्यापैकीं ४४,००० टन गहूं भारतांत येऊन पोहोंचला आहे. गव्हाच्या बदली रशिआला खुल्या बाजारांत मिळणारे पदार्थ पुरविण्यांत येणार आहेत असा संदिग्ध खुलासा करण्यांत आला आहे.

**वॉशिंग्टनमध्यें जपानचें व्यापारी प्रदर्शन**—वॉशिंग्टनमध्यें जपाननें आपलें एक व्यापारी प्रदर्शन उघडलें आहे. प्रदर्शनासाठीं ५०,००,०० डॉलर्स खर्च करण्यांत आला. प्रदर्शनांत सुमारें ५०० च्या वर जपानी कारखान्यांनीं आणि ९४ औद्योगिक संस्थांनीं भाग घेतला आहे.

**गृहशास्त्राचें कॉलेज**—हैदराबाद संस्थान सरकारनें चालू शैक्षणिक वर्षापासून स्त्रियांना गृहशास्त्राचें शिक्षण देणारें एक कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कॉलेजमधील शिक्षणाचें माध्यम इंग्रजी राहील. संस्थानांत अशा प्रकारचें शिक्षण देणारें हें पहिलेंच कॉलेज आहे.

## हिंदी विमा व्यवसाय

(डॉ. मो. ना. आगाशे, चेअरमन, वेस्टर्न इंडिया विमा. कं. लि.)

"आतांपर्यंत हा विम्याचा धंदा विशेषेंकरून शहरापुरतांच मर्यादित होता. तथापि आतां परिस्थिति बदलत आहे. ग्रामीचा ओघ ग्रामीण भागांकडे अधिक वळत आहे. यामुळें या नव्या क्षेत्रांत प्रवेश मिळविणें शक्य झालें आहे. परंतु त्यासाठी प्रथम सामान्य जनतेस विम्याचें महत्त्व पटवून देणें आणि वैयक्तिक तसेंच कौटुंबिक दृष्ट्या विमा उतरणें हें हिताचें कसें आहे हे त्यांच्या मनावर बिंबविणें हें महत्त्वाचें कार्य आहे. हें फार अवघड काम आहे. या दृष्टीनें आपण आधींच पाऊल टाकलें असून कांहीं नेमणुकाहि केल्या आहेत.

### कराचा बोजा

"विमेदारांना लाभांश (बोनस) देण्याकरितां नफ्याचा जो भाग ठेवावा लागतो त्यावर कराचा बोजा लादूं नये, हें न्यायाचे दृष्टीनें आवश्यक आहे. वास्तविक पाहातां विमा कंपन्या सध्यां भारी दरानें प्राप्तीकर भरीत आहेत आणि नव्यानेंच संमत झालेल्या फायनॅन्स ॲक्टप्रमाणें रुपायामागें ६ पै दराची पूर्वीची कमाल मर्यादा आतां ओलांडली आहे. त्रासदायक होणारे असे नवे महत्त्वाचे फरक म्हणजे प्राप्ती-करावर वाढविलेला पांच टक्कयांचा जादा बोजा (सरचार्ज); सुपरटॅक्समध्यें केलेली रुपायामागे तीन पैची वाढ आणि सुपरटॅक्समध्यें मिळणारी रुपायामागें दोन आण्यांची सूट आतां दीड आण्यावर आणली आहे हें होय. अशा प्रकारें विमा कंपन्यांच्या संबंधींचें कमाल-कर-मर्यादेचें तत्त्व बाधित झालें असून अर्थ-मंत्र्यांनीं दिलेल्या सहानुभूतिपूर्वक विचार करण्यासंबंधींच्या निवेदनाशीं वरील नवा कायदा अगदीं विसंवादी व्हावा, ही विलक्षण घटना आहे. या घटनेचे दुष्परिणाम विमा कंपन्यांना म्हणजे विमा संरक्षण घेणाऱ्या जनतेला शेवटीं नुकसानीचे होणारे आहेत.

"ता. १-६-५० पासून विमा दुरुस्ती कायदा एकदांचा कार्यवाहींत आला आहे. या कायद्यामुळें विमा-व्यवसायावर खोलवर परिणाम करणारे असे भांडवलाची उभारणी, भागीदारांचा मताधिकार, पैशाची गुंतवण, एजन्सी ऑर्गनायझेशन, खर्चाच्या मर्यादा, कमिशन, इत्यादि संबंधींचे फरक घडून आले असून त्यांचा हेतु विमा व्यवसायाचे केवळ आधारस्तंभ असे जे एजंट आणि विमेदार त्यांच्या हिताचें संरक्षण करण्याचा आहे. आपल्या दृष्टीनें दुरुस्त विमा कायद्यांतील कलमांचा परिणाम आपल्या संस्थेवर फारसा होऊं शकत नाहीं. संलग्न संस्थांत गुंतविलेल्या भांडवलासंबंधींचा प्रश्न आम्हीं कंट्रोलर ऑफ इन्शुअरन्स पुढें ठेवला असून त्यांच्याकडून मिळणाऱ्या सूचना ध्यानांत घेऊन अवश्य ते फेरफार घडविता येतील.

### विमा व्यवसायाचें वैशिष्ट्य

"दुरुस्त विमा कायद्यांत खर्चावर मर्यादा घालण्याची योजना करण्यांत आली आहे. मान्यता असलेल्या खर्चाचे हप्त्यांच्या उत्पन्नाशीं ढोबळ मानानें प्रमाण ठरविलें आहे. सरकारी योजनेनुसार खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले तरी जादा होणाऱ्या खर्चास केवळ कंपन्यांचें उधळपट्टीचें धोरण कारणीभूत होतें असें मानतां येणार नाहीं. वाढलेली महागाई कमी होईल अशी अनुकूल परिस्थिति सरकारनें निर्माण केली तरच विमेदारवर्गाच्या हिताचें खरेंखुरें संरक्षण होणार आहे.

"संसदेपुढें लौकरच विचारार्थ येणार असलेल्या कामगार संबंध विधेयकाचाही येथें थोडासा विचार कर्तव्य आहे. हें विधेयक विमा व्यवसायास लागू करणें अप्रयोजकपणाचें होईल. विमा व्यवसाय आणि इतर उद्योगधंदे आणि कारखानदारी यांच्यामध्यें मूलतः मोठा फरक आहे. आयुर्विम्यामध्यें पॉलिसी आरंभींच विकण्यांत येते आणि तिची विक्रीची किंमत विक्रीच्या वेळींच निश्चित होत असते. मृत्यूचें प्रमाण, व्याज आणि खर्च यांच्या संबंधीं अपेक्षित अनुभव जर पुढें आला नाहीं तर मग कठीण परिस्थिति निर्माण होते. हा वाढता भार हलका व्हावा म्हणून विमा कंपन्यांना आपल्या विद्यमान विमेदारांकडून चढत्या दरानें हप्त्यांची मागणी करतां येत नाहीं.

"आपल्या कंपनीचे सुविद्य मॅनेजर श्री. कृ. य. उपाख्य बाळासाहेब जोशी बी. ए., एफ. आय. ए. यांची इंडियन लाईफ इन्शुअरन्स ऑफिसेस असोसिएशनचे कार्यकारणीवर पुन्हां निवड करण्यांत आली असून ते असोसिएशनच्या शिक्षण मंडळाचेही सभासद आहेत."


# वेस्टर्न इंडियाचीं ठळक वैशिष्ट्यें

१९५० सालांतील काम

| | |
|---|---|
| एकूण चालू काम | १५ कोटी रुपयांवर |
| एकूण हप्त्यांची आवक | ७९ लाख रुपयांवर |
| एकूण आयुर्निधी | ४॥ कोटी रुपयांवर |
| एकूण क्लेम्स दिले | १॥। कोटी रुपयांवर |

आपल्या विम्यासाठी व प्रतिनिधित्वासाठी एक सर्वोत्कृष्ट व आदर्श विमासंस्था. समक्ष भेटा अथवा माहिती मागवा.

—मॅनेजर:—

वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कं. लि., सातारा.

ब्रँच ऑफिस:—१७९ बुधवार पेठ, पुणें २ (फोन नं. ३४०२)

ब्रँच ऑफिस:— C/o. केसवेल्स, ईस्ट स्ट्रीट, पुना.

# अर्थ

बुधवार, ता. ४ जुलै, १९५१







संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे



## सहकारी संघटनेमधील व्याजाचे भारी दर

भारतामधील व्याजाचे दर कांहीं ठिकाणीं बेताचे तर कांहीं ठिकाणीं फार चढीचे आहेत. शहरांचे मानानें ग्रामीण भागांत ते सर्वत्रच जास्त आढळतात. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरानें पुरेसा भांडवलपुरवठा होऊंच शकत नाहीं, अशीच सर्वत्र परिस्थिति आहे. सहकारी सोसायट्यांकडून शेतकऱ्यांना मिळणारें कर्जसुद्धा भारी दराचेंच असतें, असें आढळतें. पतवाल्या शेतकऱ्यांना अल्प मुदतीचें कर्ज ६¼% दरानें व दीर्घ मुदतीचें कर्ज ४% दरानें मिळावें असा प्रयत्न मुंबई व मद्रास राज्यांत चालू आहे आणि त्यासाठीं तेथील सरकारें आर्थिक साहाय्यहि करीत आहेत. परंतु इतर राज्यांतील परिस्थिति जवळ जवळ पूर्वीसारखीच कायम आहे. प्राथमिक सोसायट्यांचे कर्जाचे दर खालील तक्त्यांत राज्यवार दिले आहेत:—

### प्राथमिक सोसायट्यांचे व्याजाचे दर

| राज्य | प्राथमिक सोसायट्यांचा कर्जावरील व्याजाचा दर % |
|---|---|
| मद्रास | ६¼ ते ७½ |
| मुंबई | ६¼ |
| मध्य प्रदेश | ११ ते १२ |
| उत्तर प्रदेश | १०½ ते १५ |
| ओरिसा | ८ |
| बिहार | ६¾ |
| पंजाब | ६ ते १२½ |
| प. बंगाल | १२½ |
| आसाम | १२ ते १२½ |
| कूर्ग | ६¾ ते ८½ |
| अजमीर | १० |
| मध्य भारत | ९ ते १२ |
| त्रावणकोर-कोचीन | ८ |
| म्हैसूर | ७ |
| हैद्राबाद | ६¼ ते ९⅜ |

वरील तक्त्यावरून असें दिसून येतें कीं मद्रास आणि मुंबई हीं राज्यें वगळलीं, तर बाकीच्या भारतांत सहकारी संघटनेमधी-लहि व्याजाचे दर फारच भारी आहेत; तेव्हां बाजारांतील अनि-यंत्रित दरांचा बोजा किती मोठा असतो ह्याची कल्पनाच केलेली बरी. कांहीं ठिकाणीं प्राथमिक सोसायट्या १५% पर्यंत व्याज आकारतात ! खासगी सावकारांना जे व्याजाचे दर घेण्याची सावकारी नियंत्रण कायद्यानें परवानगी दिलेली आहे, ते दरच कितीतरी भारी आहेत आणि प्राथमिक सहकारी सोसायट्यांचे दर त्यांचेपेक्षां फारसे कमी नाहींत, ही स्थिति अत्यंत असमाधान-कारक आहे.

### सावकारी नियंत्रण कायद्यानें नियंत्रित केलेले दर

| राज्य | सरळव्याज तारणावरील | सरळव्याज बिगर तारणा-वरील | चक्रवाढव्याज तारणावरील | चक्रवाढव्याज बिगर तारणा-वरील |
|---|---|---|---|---|
| | % | % | % | % |
| आसाम | ९⅜ | १२½ | बंदी | बंदी |
| प. बंगाल | १५ | २५ | १० | १० |
| बिहार | ८ | १० | बंदी | बंदी |
| मध्यप्रदेश | ९ | १२ | बंदी | बंदी |
| मद्रास | १२ | १८ | १० | १० |
| ओरिसा | ९ | १५ | त्याच दराच्या सरळ-व्याजापेक्षां चक्रवाढ-व्याजाची रक्कम जास्त होतां कामा नये. | |
| कूर्ग | ९ | १२ | तरतूद नाहीं | |
| मुंबई | ६ | ७½ | बंदी | बंदी |

### कारण—मीमांसा आणि उपाययोजनांची मर्यादा

व्याजाच्या ह्या भारी दराची कारणमीमांसा रिझर्व्ह बँक बुलेटिननें खालीलप्रमाणें केली आहे:—( १ ) काटकसरीस उत्तेजन देऊन पुरेसें स्थानिक भांडवल गुंतविण्यांत सहकारी सोसायट्यांना यश आलेलें नाहीं. त्यामुळें, त्यांना भांडवलासाठी बँकांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून रहावें लागतें. ( २ ) मुंबई आणि मद्रास हीं राज्यें सोडलीं, तर इतर ठिकाणच्या मध्यवर्ती बँका लहान असून भारी व्याज आकारल्याविना त्या किफायतशीर चालणें अशक्य आहे. केंद्रीय बँकेस २% नें ठेवी मिळाल्या, तर ती २% कूस ठेवून सेंट्रल बँकांना ४% दरानें कर्जें देतें. सेंट्रल बँका ३% ते ४% कूस ठेवून त्यांना जोडलेल्या सोसायट्यांना त्या सुमारें ८% नें कर्जें देतात. सोसायट्यांची ३% कूस धरली, तर अंतिम कर्जदारास १० ते १२ % दर पडावयास जातो. ( ३ ) कांहीं राज्य-सरकारें सहकारी चळवळीस मदत करावयास तयार असलीं तरी त्यांना जरूर तो पैसा बाजारांत उभारणें कठीण जात आहे. त्यामुळें सह-कारी चळवळीस ते अल्प व्याजानें भांडवल पुरवूं शकत नाहींत.

ह्या कारणमीमांसेवरूनच उपाय सुचण्याजोगे आहेत, परंतु ते यशस्वी रीतीनें अंमलांत आणणें सोपें नाहीं. रिझर्व्ह बँक सहकारी चळवळीकडे सहानुभूतीनें पहात असली तरी ती फारसें उपयुक्त कार्य करूं शकेल, अशी चळवळीचीहि परिस्थिति नाहीं. उदाहरणार्थ, रीडिस्कौंटची सोय तिनें उपलब्ध करून दिलेल्याला अनेक वर्षें झालीं, तिचा फायदा मद्रास आणि मुंबई ह्या राज्यांबाहेर फारसा कोणाला होऊं शकला नाहीं. ह्या दोन राज्यां-तहि अशा कर्जांना फारशी मागणी आली नाहीं. स्थानिक प्रयत्नांविना राज्य-सरकारें काय किंवा रिझर्व्ह बँक काय, फारशी मदत बाहेरून देऊं शकणारच नाहींत. स्थानिक प्रयत्न हेहि शेतीच्या उत्पादनक्षमतेवर आणि किफायतशीरपणावर अखेर अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे.

## भारतांतील सेल्युलोजच्या धंद्याची वाढ

आधुनिक उद्योगधंद्यांत काष्ठकाचा ( सेल्युलोज ) अनेक प्रकारें उपयोग होत असल्याचें आढळून येत असून सेल्युलोज प्लास्टिक्स, फोटोग्राफिक व सिनेमाफिल्म, कचकडे व कृत्रिम रेशिम यांसारख्या वस्तु तयार करण्यांत त्याचा सर्वत्र उपयोग करण्यांत येतो.

सेल्युलोजचा उपयोग केला जाणाऱ्या धंद्यांची भारतांत हळूं हळूं वाढ होत आहे. गेल्या कांहीं वर्षांत सुरू झालेल्या रेयॉन विणण्याच्या धंद्यासाठीं परदेशाहून कृत्रिम रेशमाची मोठ्या प्रमाणावर आयात करण्यांत येत असून देशांतील रेयॉन व प्लास्टिकच्या धंद्यांत जसजशी वाढ होईल त्याप्रमाणें ह्या आयातीच्या प्रमाणांत वाढ होत जाईल. सेलोफेन शीटस व रेयॉनचे तंतू तयार करण्यासाठीं आयातींत लगद्यावर प्रक्रिया करणारे कारखाने सुरू करण्यांत येत असून त्यांतील कांहीं कारखान्यांतून उत्पादनासहि सुरवात झाली आहे. यानंतर सेल्युलोजचा लगदा तयार करण्याचें काम हातीं घेण्यांत येईल.

शास्त्रीय व औद्योगिक संशोधन मंडळानें या गोष्टी ध्यानांत घेऊन सर्वत्र वापरांत असलेले कॉटन लिंटर्स सोडून देशांतील सेल्युलोज असणाऱ्या निरनिराळ्या तऱ्हेच्या कच्च्या मालाची तांत्रिक दृष्ट्या व्यापक पाहाणी केली आहे. लाकडाचे निरनिराळे प्रकार, बांबू, पत्री, गवत, उसाचा चोथा आणि देशांतील निरनिराळ्या ठिकाणीं मिळणें शक्य असलेले तंतू यांवर संशोधन करण्यांत येऊन त्यापासून तयार झालेल्या लगद्याची रेयॉन तयार करण्याचे कामीं उपयुक्तता ठरविण्याचे दृष्टीनें रासायनिक तपासणी करण्यांत आली आहे. या रासायनिक चांचणीचे दृष्टीनें पाहतां असें आढळून आलें आहे कीं बांबू, पत्री व उसाचा चोथा यांपासून तयार करण्यांत आलेला लगदा अमेरिका व स्वीडनमध्यें रेयॉन धंद्यांत वापरण्यांत येणाऱ्या लगद्याच्या तोडीचा आहे. या लगद्यांपासून तयार करण्यांत आलेले सेलोफेन शीटहि आयातित लगद्यापासून केलेल्या सेलोफेन शीटच्या दर्जाचे असतात.

देशांतील निरनिराळ्या भागांत या वस्तू सहजगत्या उपलब्ध आहेत. रेयॉनच्या लगद्यासाठी वापरला जाणारा खास बांबू त्रावणकोर व त्याजवळील राज्यांतील जंगलांत मोठ्या प्रमाणावर आढळतो. तसेंच देशांतील इतर भागांतहि तो लावतां येणें शक्य असून अगदी थोड्या दिवसांत त्याची चांगली वाढ होते. हा लगदा तयार करण्यासाठी लागणारी विशिष्ट पत्री देशांतील पूर्वेकडील नद्यांच्या तीरावर वाढते, तर उसाचा चोथा देशांतील साखरकारखान्यांत मोठ्या प्रमाणावर मिळूं शकतो. देशांतील या कच्च्या मालाच्या उपयोगावर रेयॉनचा लगदा व सेल्युलोजचे इतर उद्योगधंदे या देशांत सुरू होतील.

### श्री. नाईक ह्यांचा सत्कार

दि बँक ऑफ पूना लि. चे एक डायरेक्टर, श्री. जी. के. नाईक बीएससी., बी. ई., एलएल. बी., हे आपला कॅनडा, अमेरिका व युरोप येथील दौरा संपवून नुकतेच परत आले. त्यांचा बँकेच्या डायरेक्टरांचे तर्फे सत्कार शुक्रवार, ता. २९ जून रोजीं बँकेच्या दिवाणखान्यांत करण्यांत आला.

## कोलंबो योजनेस प्रारंभ झाला

दक्षिण व आग्नेय आशियाच्या आर्थिक उद्धारासाठीं आखलेली कोलंबो योजना १ जुलै १९५१ रोजीं सुरू झाली. गेल्या वर्षींच योजनेच्या प्रारंभासाठीं ही तारीख निश्चित करण्यांत आली होती. ह्या योजनेंत भाग घेणाऱ्या स्वायत्त राष्ट्रांनीं स्वतंत्र अशा सहा वर्षांच्या योजना आंखल्या आहेत, त्यांचा एकत्रित विचार म्हणजेच कोलंबो योजना होय. प्रत्येक देशानें स्वतःच्या गरजा व भौगोलिक परिस्थिति ह्यांचा विचार करून योग्य त्या योजना तयार केल्या आहेत.

### खर्चाची तरतूद

भारताच्या योजनांसाठी सहा वर्षांत मिळून १,८४० कोटी रुपये लागणार आहेत. त्यांपैकीं सरकार १,००० कोटींची तरतूद कर, सरकारी खर्चांत काटकसर, कर्ज उभारणी, ह्या मार्गांनीं येथेंच करणार असून बाकीचे ८४० कोटी रुपये बाहेरून यावे लागतील. दरसाल ३१ कोटी पौंड रकम पौंडी गंगाजळींतून वापरले तर सहा वर्षांत त्याचे २८० कोटी रुपये होतील. प्लॅनिंग कमिशन योजनांचा तपशील पुरा करीत आहे. पहिल्या वर्षाच्या खर्चासाठी कॅनडानें ५ कोटी रु. व ऑस्ट्रेलियानें ५½ कोटी रुपये देऊं केले आहेत. अर्थात, ह्या रकमा यंत्रसामुग्री, जिन्नस, अन्नधान्य, इत्यादि स्वरूपांत मिळतील. त्यांची येथें विक्री केली, म्हणजे त्याचे पैसे उभे राहातील. अमेरिकेकडून गहूं खरीदण्यासाठी कर्ज मिळालें, त्याच्या मदतीनें अमेरिकेंत गहूं खरीदून तो येथें विकला म्हणजे त्याची रकमहि कांहीं योजना पुऱ्या करण्यास उपयोगी पडेल.

### इं. फि. कॉर्पोरेशनचे मॅ. डायरेक्टर, श्री. सोनाळकर

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. रामनाथ ह्यांची रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर म्हणून नेमणूक झाल्यानंतर कॉर्पोरेशनचे डेप्युटि मॅ. डायरेक्टर श्री. व्ही. आर. सोनाळकर ह्यांची त्यांचे जागीं नुकतीच नेमणूक झाली आहे. औद्योगिक कंपन्यांना कोट्यावधि रुपयांची कर्जे देणाऱ्या ह्या महत्त्वपूर्ण संस्थेच्या प्रमुख स्थानीं श्री. सोनाळकर ह्यांची योजना झाली, ह्याबद्दल महाराष्ट्रीयांना आनंद होईल. २९ वर्षांपूर्वी त्यांचा सेंट्रल बँक ऑफ इंडियांत प्रोबेशनर म्हणून प्रवेश झाला. त्यांचें शिक्षण पुणें व मुंबई येथें झालेलें आहे. सेंट्रल बँकेचे एजंट म्हणून त्यांनीं रंगून, कराची आणि अमृतसर येथें काम केलेलें आहे १९३७ सालीं ते बँक ऑफ बरोडामध्यें चीफ अकौंटंट म्हणून गेले. पुढें ते युनायटेड कमर्शिअल बँकेचे डेप्युटि जनरल मॅनेजर झाले. त्यांनीं जगांतील कित्येक देशांत प्रवास केलेला आहे. त्यांचें वय ५१ वर्षांचें आहे.

### "प्राइसेस इन अवर एकॉनॉमिक स्ट्रक्चर"

पांचव्या ओगले स्मारक दिनानिमित्त श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं मराठा चेंबरमध्यें वरील विषयावर व्याख्यान दिलें, तें चेंबरनें आतां पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे. पुस्तकाची पृष्ठसंख्या २८ असून त्याची किंमत ८ आणे आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

## श्री. देशमुख यांचे आजच्या परिस्थितीबद्दल विचार

मुंबई येथें ता. २२ जून रोजीं श्री. एस्. के. पाटील यांनीं घडवून आणलेल्या स्वागत समारंभाचे वेळीं हिंदचे अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख यांनीं आजच्या परिस्थितीबद्दल पुढील विचार व्यक्त केले:—"एकंदर परिस्थिति लौकरच सुधारणा होईल असें दर्शवीत नसली तरी परिस्थिति जास्त बिघडणार नाहीं. गेल्या चार पांच महिन्यांत वस्तूंच्या बाजारभावांत म्हणण्यासारखे फरक पडलेले नाहींत. मध्यम वर्गीयांची स्थिति जास्त खालावली आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें ही गोष्ट अपरिहार्य आहे. वस्तूंचे बाजारभाव आटोक्यांत आणण्याचा मीं अर्थमंत्रीपद स्वीकारलें त्यावेळीं माझा उद्देश होता; परंतु आंतरराष्ट्रीय परिस्थिति व नैसर्गिक आपत्ति यांमुळें ही गोष्ट साध्य झाली नाहीं. कापूस व ताग यांच्या बाबतींत परिस्थिति निश्चितपणें सुधारत चालली आहे. कापसाच्या पिकाची जागतिक परिस्थिति समाधानकारक आहे व हिंदमधील तागाची लागवड वाढत आहे. पाकिस्तानच्या मदतीनें हे दोनहि धंदे चालू शकतील. कापडाच्या धोरणाच्या बाबतींत कांहीं चुका झाल्या, परंतु त्या समजून आल्यावर सुधारण्यांत आल्या आहेत. सरकारला अंदाज करावे लागत असून भावी योजना ठरवाव्या लागत आहेत. यामुळें किंमती मर्यादेंत राखून विकास-योजनांबद्दल साधनसामुग्रीची जुळवाजुळव सरकारला करतां येत आहे. प्लॅनिंग कमिशनला योजनांचा क्रमांक ठरवावा लागत आहे, व त्यामुळें पुष्कळशा लोकांना काम मिळूं शकत आहे. भावी परिस्थितीबद्दल आशा वाटत असल्यामुळें मला काम करावयास उत्साह वाटतो, व अशीच दृष्टि प्रत्येकानें ठेवावी अशी माझी इच्छा आहे."

## बोरिंगचे नवे दर

शेतकी खात्याच्या बोरिंगच्या यंत्रानें जीं बोरचीं कामें करण्यांत येतात त्यासाठी शेतकऱ्यांना आकारावयाच्या दरामध्यें मुंबई सरकारनें पुन्हा दुरुस्ती केली आहे. घसारा व व्याज या बाबतींत शेतकऱ्यांकडून आकार घ्यावयाचा नाहीं असें सरकारनें ठरविल्यामुळें मार्चमध्यें जाहीर केलेल्या दरांपेक्षां हे नवे दर थोडे कमी आहेत.

गेल्या एप्रिलपासून हे नवे दर ( दर फुटास किती रुपये ? ) अंमलांत आले असून ते पुढीलप्रमाणें आहेत:—

| खोली फूट | चार इंची बोर | सहा इंची बोर | आठ इंची बोर |
|---|---|---|---|
| ० ते १०० | रु. १६ | रु. १९ | रु. २४—८—० |
| १०१ ते २०० | रु. १८ | रु. २१ | रु. २६—८—० |
| २०१ ते ३०० | रु. २० | रु. २३ | रु. २८—८—० |
| ३०१ ते ४०० | रु. २३ | रु. २६ | रु. ३१—८—० |
| ४०१ ते ५०० | रु. २६ | रु. २९ | रु. ३४—८—० |
| ५०१ ते ६०० | रु. ३० | रु. ३३ | रु. ३८—८—० |
| ६०१ ते ७०० | रु. ३४ | रु. ३७ | रु. ४२—८—० |
| ७०१ ते ८०० | रु. ३८ | रु. ४१ | रु. ४६—८—० |

बोरिंगचीं कामें करण्यासाठी सरकारनें जिल्हा लोकलबोर्डांना जीं यंत्रें दिलीं आहेत त्यांच्या बाबतींतहि जिल्हा लोकलबोर्डें हेच दर आकारतील.

नव्या दरांत सर्व प्रकारच्या खर्चाचा समावेश केला असल्यामुळें शेतकऱ्यांनीं कोणत्याहि प्रकारचा जादा आकार देण्याची आवश्यकता नाहीं.

## वेस्टर्न इंडियाची परंपरा

वेस्टर्न इंडियानें चांगलें काम मिळविण्याची व काटकसरीच्या आणि किफायतशीर कारभाराची परंपरा कायम ठेवली आहे. १९४९ मध्यें तिनें २ कोटी, ४५ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें होतें; १९५० मधील पुऱ्या कामाचा आकडा २ कोटी, ६३ लक्ष रु. झाला आहे. १९४७ सालापासून विम्याचा एकूण धंदा कमी झाला असला, तरी वेस्टर्न इंडियाचें काम वाढत आहे. म्हणजे, एकूण हिंदी कामांतील तिचा हिस्सा त्याहीपेक्षां जास्त प्रमाणांत वाढत गेला आहे. योग्य खर्चातच परंतु टिकाऊ काम मिळविण्याची दक्षता वेस्टर्न इंडिया घेत असते. सर्व अडचणी असतांहि वेस्टर्न इंडियाला एकूण व्याजाचा दर ४·५५% आणि निव्वळ व्याजाचा दर ३·५७% पडला. १९४९ चे तत्सम आकडे अनुक्रमें ४·३१% व ३·४४% असे होते. १९५० सालीं कंपनीच्या आयुर्निधींत ५१ लक्षांची भर पडून तो निधी आतां ४ कोटी, ६७ लक्ष रु. झाला आहे. कंपनीनें विमेदार किंवा वारस ह्यांच्या सुमारें १,५०० कुटुंबांकडे १९५० सालीं २३ लक्ष रु. ची विमा रक्कम पोचवेली, ह्यावरून विमा संस्थेच्या उपयुक्त कार्याची कल्पना येईल. चिरमुले इं. इन्स्टिट्यूटचें शिक्षणकार्य चालू आहेच. वेस्टर्न इंडियानें आपला सर्वांगीण पुढाकार कायम राखण्यांत सालोसाल मिळविलेल्या यशाबद्दल तिचे चालक अभिनंदनास पात्र आहेत.

### विजेच्या दिव्यांचें उत्पादन

म्हैसूर लँप वर्क्स कंपनीच्या वाढत्या पसाऱ्याविषयीं म्हैसूरच्या वीजमंत्र्यांनीं पुढील माहिती एका प्रसंगीं सांगितली:—"ह्या कारखान्याची उत्तरोत्तर प्रगति होत असून अमेरिकन तज्ज्ञाच्या मदतीनें अगदी आधुनिक तऱ्हेचीं यंत्रें आतां कारखान्यांत बसविण्यांत आलीं आहेत. ह्या नवीन यंत्रांमुळें कारखान्याचें विजेच्या दिव्यांचें रोजीं उत्पादन १,५०० वरून ६,५०० पर्यंत वाढलें आहे. १९४७–४८ मध्यें कंपनीनें ४॥ लाख दिवें तयार केले होते. १९५० सालीं सुमारें १३ लाख दिवे तयार करण्यांत आले. ह्याच कालावधींत कंपनीचा नफा वार्षिक १ लाख, ९ हजारांवरून ४ लाख रुपयांपर्यंत वाढला आहे. म्हैसूर येथील विजेचे दिवे लोकप्रिय झालेले आहेत आणि त्यांच्या दर्जांत आणखी सुधारणा करण्यांत आली आहे. कारखान्याला लागणारा कच्चा माल परदेशांहून आणावा लागतो. हें परावलंबित्व दूर करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. दिवे बसविण्यासाठी लागणाऱ्या पितळी कॅप्स ब्रिटनहून आणाव्या लागतात. त्यासुद्धा कारखान्यांतच बनविण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. नेहमींच्या दिव्यांखेरीज सायकलींना लागणारे दिवे, टॉर्चचे दिवे, मोटारींचे दिवे इत्यादि माल तयार करण्यासाठी प्राथमिक प्रयत्न चालू करण्यांत आले आहेत. कारखान्याचा व्याप अशा रीतीनें वाढत असला तरी मागणीच्या मानानें पुरवठा कमीच आहे. भारताला दरवर्षी सुमारें १४४ लाख विजेचे दिवे लागतात असा अंदाज आहे. म्हणजे कारखान्यानें सध्याच्या उत्पादनाच्या १२ पट उत्पादन केलें तरीसुद्धा त्याला भरपूर वाव आहे. म्हैसूर संस्थानांतील विजेचें उत्पादन वाढविणाऱ्या योजना अंमलांत आणण्यांत येत आहेत. ह्या योजना पुऱ्या झाल्यावर विजेच्या ग्राहकांची संख्या वाढेल आणि त्याबरोबरच दिव्यांची मागणीहि अधिक येईल. अर्थातच कारखान्याचें उत्पादन वाढविण्यास खूप जागा आहे."

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) || श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ३,९९,३८५ |

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. १४८३ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — म. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठा.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. २६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. | ३२,४१,००० |
| ठेवी | रु. | ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १०,४२,९३,००० |

१५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## तिबेट–भारतमधील व्यापार

तिबेट आणि भारत ह्यांच्यामधील व्यापार भोटिआ नांवाची एक जमात करीत असते. ह्या जमातीच्या व्यापारी तांड्यांना प. तिबेटमध्यें पोंचण्यासाठीं १८,००० फूट उंचीवरून जावें लागतें. संयुक्त–प्रांतांतील कुमाऊन डोंगरांत या जमातीचा मुक्काम असतो आणि तेथून त्यांचे काफिले दरवर्षीं तिबेटला जातात. चालू वर्षाचा व्यापाराचा हंगाम आतां सुरू झाला आहे. प. तिबेटच्या गव्हर्नर कडून निरोप आला म्हणजे ह्या व्यापाराला प्रारंभ होतो. प. तिबेटांत आतां सर्व स्थिरस्थावर झालें असून व्यापारास हरकत नाहीं अशी वार्ता भोटिआ व्यापारी जमातीला मिळाली आहे. परंतु प्रत्यक्ष तिबेटमध्यें जाईपर्यंत ह्या वार्तांवर त्या जमातीचा विश्वास बसत नाहीं असें समजतें. प. तिबेटशीं होणाऱ्या व्यापारांत संयुक्त–प्रांत राज्याचा भाग बराच मोठा आहे. तथापि व्यापारी उलाढालीची किंमत करणें मात्र फारसें सोपें नाहीं. प. तिबेटला जाण्यासाठी एकूण आठ मार्ग संयुक्त प्रांतांतून आहेत. त्यांपैकीं ५ अल्मोरा जिल्ह्यांतून, २ गढवालमधून आणि एक तेहरी भागांतून आहे. सुमारें ४५ वर्षांपूर्वीं ह्या सर्व डोंगरी मार्गांनीं मिळून ४५ कोटी रुपयांचा व्यवहार होत असे. तेव्हांपासून आजतागायत व्यवहारांत बरीच वाढ झाली असली पाहिजे असा अंदाज आहे. व्यापाराचा हंगाम जूनमध्यें सुरू होऊन नोव्हेंबरपर्यंत चालतो. भोटिआ व्यापाऱ्यांचे कांहीं तांडे माल घेऊन प. तिबेटमध्यें जाण्यास निघालेहि आहेत. कांहीं तांडे मात्र निघतील कीं नाहीं ह्याची शंका आहे. कारण, भोटिआ व्यापारी आणि संयुक्त–प्रांत सरकार ह्यांच्यांत कापडाच्या गांठीसंबंधीं तंटा उत्पन्न झाला आहे. भोटिआ व्यापाऱ्यांना कापडाच्या ५०० गांठी देण्यांत यावयाच्या होत्या. तंट्याचा निकाल लवकर लागला नाहीं तर भारत आणि तिबेट ह्यांच्या व्यापारांत बराच बिघाड होण्याचा संभव आहे. अल्मोरा येथें भोटिआ व्यापारी आणि संयुक्त–प्रांत सरकार ह्यांच्यांत वाटाघाटी चालू आहेत. ता. २५ मे पासून भोटिआंचे १५० प्रतिनिधी अल्मोरा येथें तळ ठोकून आहेत.

## ओरिएंटलचं काम

ओरिएंटल विमा कंपनीनें १९५० साली २० कोटी, ५० लक्ष रुपयांचें काम पुरें केलें. १९४९ मध्यें १९ कोटी, ४८ लक्ष रुपयांचें काम झालें होतें. १९५० असेर १८० कोटींचे विमे चालू आहेत. गेल्या वर्षीं कंपनीनें ३ कोटी, ४३ लक्ष रुपयांचे क्लेम्स दिले. त्यांपैकीं १ कोटी, २० लक्ष रुपयांचे क्लेम्स मृत्यूमुळें निर्माण झाले होते. एकूण उत्पन्न १० कोटी, २७ लक्ष रुपये झालें.

## लॉइड्स बँकेच्या नोकरांना नुकसानभरपाई

लॉइड्स बँकेच्या पैशाच्या थैल्या लांबविण्यासाठी घातलेल्या दरोड्याचे वेळीं टॅक्सीवाल्याचा बळी पडला. त्याच्या विधवा पत्नीस लॉइड्स बँकेनें १०,००० रु. नुकसानभरपाई म्हणून मंजूर केले आहेत. कॅशरला दुखापत झाली होती, त्याला ५०० रु. व ६ महिने पगारी रजा; रखवालदाराचा डोळा गेला त्याला ३,००० रु. व २ महिने पगारी रजा आणि पोटांत गोळी बसलेल्या शिपायाला १,००० रु. व २ महिने पगारी रजा अशी भरपाई देण्यांत आली आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या तक्त्यांत सुधारणा

२२ जून रोजीं संपलेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेच्या प्रसृत चलनी नोटांत घट होऊन, त्या १२७९·५३ कोटी रु.वरून १२६२·५३ कोटी रु.वर आल्या. बँकिंग खात्यांतील नोटा ३१·७५ कोटी रु. च्या ४९·५१ कोटी रु. च्या झाल्या. व्यापारी बँकांच्या रिझर्व्ह बँकेजवळील ठेवी ५५·७९ कोटी रु. वरून ५८·९२ कोटी रु. वर गेल्या. मध्यवर्ती सरकारच्या ठेवींतहि वाढ होऊन ती १४०·५६ कोटी रु. ची १५४·८० कोटी रु. झाली.

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.** (स्थापना १९१८)

शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

**पाकिस्तानसाठी जपानी तंत्रज्ञ**—पाकिस्तान सरकारच्या आमंत्रणावरून १० जपानी तज्ज्ञ पाकिस्तानांत जाणार आहेत. पाकिस्तानच्या उद्योगधंद्यांची वाढ करण्यासाठी ते मदत करणार आहेत. पाकिस्तानमधील वीज–उत्पादनाचीं केंद्रें, कापडाच्या गिरण्या, रसायनाचे कारखाने, रेल्वे आणि बोटी बांधण्याचा धंदा ह्या धंद्यांची पहाणी जपानी तज्ज्ञ करणार आहेत असें समजतें.

**पाणथळ जमिनीची सुधारणा**—उत्तर प्रदेश सरकारनें पाणथळ जमिनींतून पाण्याचा निचरा करून ८०,००० एकर जमीन लागवडीखालीं आणण्याची एक योजना आंखली आहे. अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा हा एक भाग आहे. जिल्हा अधिकाऱ्यांना अशा जमिनी लवकर ताब्यांत घेण्याची सूचना देण्यांत आल्या आहेत.

**भारताचा औद्योगिक नकाशा**—भारतामधील खनिजें, उद्योगधंदे व शेती दाखविणारा पाहिला नकाशा मुंबईंतील एका कंपनीनें प्रसिद्ध केला आहे. नकाशांत भारतामधील सर्व भागांचा समावेश करण्यांत आला आहे. माहिती चटकन सांपडण्याची व्यवस्था करण्यांत आली असून खुणांचा खुलासा इंग्रजी व हिंदी भाषेंतून करण्यांत आला आहे.

**पगड्यांचीं बक्षिसें**—अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठीं ज्या स्पर्धा ठेवण्यांत आल्या आहेत, त्यांत यशस्वी होणाऱ्या शेतकऱ्यांसाठीं पगड्या देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. पगड्यांच्या बक्षिसासाठीं सरकारला २,५०,००० रुपये खर्च येणार आहे.

**भारताला कागद मिळणार**—इंटरनॅशनल रॉ मटेरिअल्स कॉन्फरन्सची एक बैठक नुकतीच झाली. ज्या देशांत वृत्तपत्राच्या कागदाचा अतिशय तुटवडा आहे त्यांना ९,५५० टन कागद मंजूर करण्यांत आला आहे. फिलिपाइन्स, युगोस्लाव्हिआ, ग्रीस, मलाया व सिंगापूर ह्या देशांना कागदाचा पुरवठा मंजूर करण्यांत आला. भारताला २,४०० टन आणि पाकिस्तानला ५०० टन कागद मंजूर करण्यांत आला आहे.

**सूक्ष्म यंत्रें तयार करणारा कारखाना**—संयुक्त प्रांत सरकारनें सूक्ष्म यंत्रें तयार करण्याच्या आपल्या कारखान्यांत चालू वर्षीं पुढीलप्रमाणें उत्पादन करण्याचें ठरविलें आहे. १५,००० वॉटर–मीटर्स, ५,००० रेडिओ सेटस्, ३,००० सूक्ष्मदर्शक यंत्रें, ५,००० वैद्यकीय पिचकाऱ्या आणि १,००० थर्मामीटर्स. कारखान्यानें आतांपर्यंत १,००० वॉटर मीटर्स बनविले आहेत. सरकारच्या मालकीचा अशा प्रकारचा कारखाना त्या प्रांतांत हा पहिलाच आहे.

**मानसिक रोगांसाठी तज्ज्ञ**—संयुक्त प्रांतांतील इस्पितळांत मानसिक रोगानें पछाडलेले जे लोक आहेत, त्यांच्यावर उपचार करण्यासाठीं एक मनोव्यापार तज्ज्ञ नेमण्याचा सरकार विचार करीत आहे. वैद्यकीय उपचाराबरोबरच मानसिक उपचार देण्यांत आले तर हे रोगी लवकर बरे होण्याचा संभव आहे.

## COOPERATION AND ACCOUNTANCY DIPLOMA BOARD

The undermentioned Candidates have been declared by the Cooperation and Accountancy Diploma Board to have passed the Government Diploma in Cooperation and Accountancy Examination held in April 1951, at Poona.

Passed in the whole Examination including those who passed in one or the other part previously.

**II Class**

Bhagwat L. M., Jadhav S. P., Joshi K. G.

**Pass Class**

Bhatt R. H., Panchwadkar P. N., Prayag B. S., Walvekar R. R., Abhyankar Y. K., Bhandare J. M., Buddhecha L. A., Chaudhari G. M., Hegade R. M., Joshi M. K., Kalaskar S. R., Karnataki P. L., Kamodia N. R., Kulkarni V. R., Naik H. B., Naik M. N., Patil E. A., Patki M. D., Patwardhan P. K., Shah M. B., Thombre S. V., Vantmuri S. V.

**Passed in Accountancy Group only.**

Karkhanis P. T., Kirpalani R. M., Bailkeri J. N., Bedadur G. D., Dalal S. C., *Miss Deo P. G.*, Deshpande R. A., Dighe A. V., Dounde K. K., Gavande B. V., Joshi C. C., Joshi Vishnu Vinayak, Kadkol N. S., Kanade D. K., Kulkarni K. H., Mulla A. A., Mutalik Desai B. K., Nudgauda K. N., Navik B. G., Nemade B. C., Pande M. P., Patel B. B., Pathan M. M., Patki K. N., Prabhu Desai G. S., *Miss Sobti K. S.*, Thatte M. S.

**Passed in Cooperation Group only.**

Chinchwadkar M. D., Darshane A. G., Hiremath Chandrashekar Rachaya, Hiremath S. K., Ifrazuddin Navasuddin, Joshi S. T., Kalghatgi S. H., Raje K. D., Annigeri G. V., Banakar B. M., Bhadgaonkar J. N., Bhatt V. D., Budihal Y. C., Chaudhari D. C., Chaudhari M. S., Dixit K. Y., Galgali S. K., Ghandhe V. S., Hiremath G. V., Joshi S. S., Kolli U. C., Kulkarni N. D., Naik K. V., Patel B. S., Patel R. N., Phadnis R. G., Pradhan Y. A., Purohit B. B., Thakar S. V., Trivedi G. J.

P. J. Chinmulgund,
Registrar & Chairman,
Cooperation & Accountancy
Diploma Board, Poona.

## THE CO-OPERATIVE TRAINING COLLEGE, POONA.

Results of the examination for the "Higher Diploma in Co-operation" held in April, 1951. The names are arranged in the order of the class and number of marks obtained.

| Name | Marks obtained |
|---|---|
| **First Class** | |
| Deodhar R. R. | 472 |
| Kamodia N. R. | 462 |
| Pandya Y. L. | 456 |
| Patel D. K. | 443 |
| Buddhecha L. A. | 437 |
| Joshi S. T. | 432 |
| Totade D. D. | 430 |
| Abhyankar Y. K. | 427 |
| Desai B. M. | 425 |
| Muchhal L. B. | 423 |
| Dharap M. G. | 423 |
| Singhal S. C. | 421 |
| **Second Class** | |
| Rege P. Y. | 417 |
| Mehta C. S. | 414 |
| Hajela S. A. | 413 |
| Chothe P. P. | 413 |
| Patel L. M. | 410 |
| Chinchawadkar M. D. | 376 |

| Name | Marks obtained |
|---|---|
| Patel C. P. | 374 |
| Dodia N. S. | 370 |
| Maniar C. J. | 356 |
| Purandare V. H. | 356 |
| Patel N. V. | 354 |
| Patel N. B. | 351 |
| Phatak M. D. | 351 |
| **Pass Class** | |
| Patel M. P. | 348 |
| Patil B. B. | 347 |
| Budihal Y. C. | 346 |
| Joshi T. P. | 342 |
| Patil P. V. | 341 |
| Bhirud P. K. | 311 |
| Khot N. A. | 308 |
| Thaker M. A. | 308 |
| Bhandare J. M. | with exemptions |
| Pandya J. H. | with exemptions |
| **Passed in an additional optional subject** | |
| Shah C. A. | Marketing |

Prizes have been awarded as under :-

1. Bombay Provincial Co-operative Bank. Prize Rs. 100/- — Deodhar R. R.
2. The Karnatak Central Co-operative Bank Ltd. Prize Rs. 60/- — Pandya Y. L.
3. The Gadag Cotton Sale Society Ltd. Prize Rs. 50/- — Hajela S. A.
4. The Provincial Industrial Co-operative Association. Prize Rs. 50/- — Deodhar R. R.

Poona 1.
26th June, 1951.

D. A. Shah,
Principal & Secretary,
Co-operative Training College
Committee, Poona.

### मुंबई मजदूर को. सोसायटी लि.

शेअर भांडवल रु. २८००/– व रिझर्व्ह फंड रु. २८३२/– मालधक्क्यावर बोटींमध्यें माल चढवणें व उतरवणें ही मजुरी मुख्यतः या सोसायटीतर्फे केली जाते. या सोसायटीची स्थापना कंत्राटदाराकडून मजुरांची होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी व मजुरांमध्यें एकी व स्वाभिमान वाढविण्यासाठी झाली. आज त्याचें काम इतक्या उत्तम रीतीनें चाललें आहे कीं कंत्राटदाराच्या पिळवणुकीच्या पद्धतीतून कामगार पूर्णपणें बाहेर पडला आहे. आज कामगार स्वतःची सर्व जबाबदारी उचलीत आहेत, व त्यांच्या प्रतिनिधींना आज सन्मानाची वागणूक मिळत आहे. अंड्यांची पार्सलें उतरण्याचें कंत्राट घेण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. कामगारांना सत्त्व अन्न मिळावें यासाठी स्वतःचें हॉटेल उघडण्याचा त्यांचा विचार आहे. गेल्या वर्षी रु. ४,५२,४१९/– रुपयांचा धंदा या सोसायटीनें केला व निव्वळ नफा रु. १०,६२३ मिळाला.

**भारतीय बोलपटांचा ब्रिटिश उत्पादक**—जे. ऑर्थर रँक हे ब्रिटिश बोलपटांचे निर्माते मि. पॉल झिल्स यांच्या साह्यानें भारतीय विषयावर हिंदी व इंग्रजी बोलपट काढणार आहेत असें समजतें. मि. पॉल झिल्स ह्यांचे 'हिंदुस्थान हमारा" व "अवर इंडिआ" हे बोलपट चांगलेच गाजलेले आहेत. १९५२ मध्यें त्यांचे दोन चित्रपट भारतांत दाखविले जाण्याचा संभव आहे. अकबर बादशहाच्या जीवनावर एक बोलपट काढण्यांत येणार आहे.

**मद्रास सरकारचें कर्ज**—मद्रास सरकारनें ५ लाख रुपयांचें नवीन कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. ह्या कर्जाचा विनियोग प्रांतांतील पाटबंधाऱ्यांच्या आणि वीज-उत्पादन केंद्रांच्या योजना पूर्ण करण्याकडे करण्यांत येणार आहे.

**व्यापारांत अनुकूल तफावत**—ऑक्टोबर १९५० ते मार्च १९५१ ह्या सहा महिन्यांच्या काळांत भारत आणि अमेरिका ह्यांच्यांत जो व्यापार झाला त्यांत भारतानें आयातीपेक्षां २,८४,००,००० डॉलर्स किंमतीच्या अधिक मालाची निर्यात केली असें समजतें.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.